# AAMI GOENKAR

For Goans, Of Goans, By Goans

Aami Goenkar

Issue No 48 | MARCH 2022






## PRESIDENT'S MESSAGE

My Dear Members,



Greetings to all AamiGoenkar brothers and sisters as I pen down this first message in the new year to you. I wish that 2022 will bring joy and happiness to you and your family. I consider this an honour and privileged to be given an opportunity to serve our institution as its President. We have moved forward despite challenges over past decade and half due to continued pro-active role of its members and well-wishers.

The current Covid –19 pandemic is an unprecedented ordeal that has created immense challenges for the community. During this unique period, many of our members were involved in performing role of a good citizen by helping sections of society in managing their lives. One of the highlights of this period is continuous two-way interaction between members and committee and among members. In effect, during this period, despite huge problems created by issues beyond our control, members and committee worked together to find alternative solutions. In the process, we emerged stronger. The Committee took a conscious decision to put on hold our annual signature programs like Goa Festival, Goa Liberation Day during this period.

I am delighted to inform you that the committee has taken decision to recommence these programs and we have made a grand beginning by celebrating Goa Liberation Day on December 19th, 2021 in the memory of freedom fighters of Goa. The program was very well attended and discerning members enjoyed musical program and connected to fellow members after a gap of a year and half.

As you may recall, we had brought out a special issue of Aami Goenkar quarterly bulletin in October 21 in loving memory of Sanjay bab.We wish to bring out e-edition of the bulletin on quarterly basis which will have coverage on subjects of topical interest and other important event concerning Goans. In case, there is any change to your email address, do let us know.

Sanjay used to say, "We are indebted to society in many ways and our personality is deeply influenced by how we frame events in our past. It is important that after our basic life needs are satisfied, we must honour our obligations to the society to bring about improvement in basic welfare of the people. Governments, on their part are making efforts to implement social welfare measures to many sections of the society but is not able to reach out to certain sections of community."

As I look back over the life journey of our Saunstha it gives me a lot of satisfaction that we, as a team have been successful in creating a platform to develop and promote the mission for

(Contd. on page #2)

## IN THIS ISSUE


| | | |
|---|---|---|
| 1. | Sanjay Hegde Sports Academy | 2 |
| 2. | 19 December Goa Liberation Day | 3 |
| 3. | Surel Aawaj Harapala | 4 |
| 4. | Sudesh Bhosle Awarded... | 5 |
| 5. | Goa @60 | 6 |
| 6. | Announcement Musical Program | 7 |
| 7. | Ek Shaddhaj Visavala | 8-9 |
| 8. | Obituary | 10 |
| 9. | Homeopathy: The Misunderstood Science | 11 |
| 10. | Hindu Festive Season | 12 |



For any correspondence, please contact:

**Aami Goenkar**

1, Malan Mension, Baburao Parulekar Marg
Off Gokhale Road South, Opp. Desai Hospital
Dadar (West) Mumbai 400 028
T : 022 2431 6277
M : 098206 23089
E : aamigoenkar@yahoo.in
W : www.aamigoenkar.org


Aami Goenkar

**BOOK POST**


**Editorial Team:** CA Mohan K. Sanzgiri, Dr. Smt. Asmita S. Hegde, Satish Kamat and S R Prabhugaonker

॥ उध्दरेदात्मनानम् ॥
अभिनव ज्ञान मंदिर संस्था व सेवा सहयोग फाउंडेशनची

# संजय हेगडे स्पोर्ट्स अकादमी
# SANJAY HEGDE SPORTS ACADEMY








Our ex-president, late **Shri Sanjay Hegde** being a sports person himself always believed that the sports talent of the rural children should be provided with enough sports infrastructure. So he had started a sports academy 4 years ago at Abhinav Vidyamandir, Karjat through Seva Sahayog Foundation. On his birth anniversary, 30th October 2021, the same was named after him. The students of 14 surrounding schools get free coaching in Athletics, Table Tennis, Weightlifting, Wrestling, Chess and Archery at this centre. One more similar academy was inaugurated on 23rd March 2022 at Vivekanand Sankul, Sanpada where students will be trained for Badminton, Archery, Table Tennis, Athletics, Kabaddi and Kho-Kho.

Late Shri Sanjay Hegde, being the promoter of 'Reverse Migration', always believed that if the youth from the villages get trained in various skills, they won't have to migrate to cities and can live a better life in the villages itself. Thus, through Seva Sahayog Foundation, he had introduced various courses like computer training, mobile repairing, tailoring, beautician, Mehendi, baking, masala making at a centre in Boisar, Palghar. This centre was recently redesigned and named after him. A similar computer training centre has also been started at Nerul, Navi Mumbai in his memory.

*(Conti. from Page #1)*

which we came into existence over a decade and half ago. We have had several successes and a few failures, rather missed opportunities during this period. Despite all odds we have survived and have remained firm on our core objectives. This gives me encouragement and makes me optimistic about institution's future as it has lot to contribute to society.

I sincerely believe that we are indebted to the society and owe a lot to our school, college, teachers, neighbourhood which has facilitated our growth and must have a deep sense of gratitude and work towards returning to the society more than our basic needs.

I keep revisiting discussions with Sanjay and other founder members and visualise a decade ahead for us and action plan to regain glory and make our Saunstha truly great one. I have shortlisted five goals as our focus areas:

1. Mobilisation of financial resources to achieve sustainability through membership drive and outreach programs of Goans in India and overseas.
2. Creating a second line of leadership by involving generation next in our initiatives and programs.
3. Build on success of Goa Festival and nurture and support entrepreneurs.
4. Re-focus on our core objectives – Education, culture, health through partnerships with like minded institutions
5. Publications on Goa and its culture beginning with a book on – "FESTIVALS OF GOA"

We have reconstituted our Managing Committee with an eye on future with right mix of experience and youth. I am aware that in current situation raising financial resources is a big challenge, but I am confident that good work does not get hampered for lack of funds so long as we remain focused on our vision and build by a balanced team of good people.

I thank you, once again, for your continued support and look forward to an excellent and exciting year ahead.

I extend my heartfelt wishes to you and your families for the festive season and request for your continued participation in the initiatives of our institution.

CA Mohan Sanzgiri
President
March 25, 2022

# १९ डिसेंबर २०२१ गोवा मुक्तीदिन

















**सालाबादप्रमाणे ''आमी गोंयकार'' नी रविवार, १९ डिसेंबर २०२१ रोजी, सायांकाळी ५ वाजल्यापासून, गोमांतक सेवा सांघाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात, गोवा मुक्तीदिन साजरा केला. यावर्षीच्या कार्यक्रमाला दुः खाची किनार होती, तरीही कार्यक्रम संस्मरणीय झाला.**


कार्यक्रमाला थोडी उशीरानेच सुरुवात झाली खरी परंतु अध्यक्ष श्री मोहन संझगिरी यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या सुरुवातीपासून, २०२०चा अपवाद वगळता यावर्षीपर्यंतचा प्रवास थोडक्यात उलगडला. आमी गोंयकारच्या गमावलेल्या हिऱ्यांचा नामोल्लेख करूनच, त्यांनी ठरविलेली ध्येये श्रोत्यांसमोर मांडली. गोव्यातील सर्व उत्सवांचे एकत्रित सांकलन करून पुस्तकरुपाने प्रकाशित करायचे आहे. तसेच समाजातील ज्येष्ठ नागरीकांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्यांच्यासाठी ठोस उपक्रम सुरू करायचा आहे. तसेच सध्याच्या करोना काळातील अनिश्चितता नकारात्मक वातावरणातून तरुणाईला समुपदेशन करून योग्य मार्गदर्शन करण्यासाठी पावले उचलायची आहेत. ही आमी गोयंकारची नजिकच्या भविष्यातील उद्दिष्टे गाठायची आहेत असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातील, एका विद्यार्थ्याला त्यांनी योग्यवेळी केलेल्या समुपदेशनाने कसे सुंदर वळण मिळाले हा अनुभही उद्धृत केला.

त्यानंतर ॲडव्होकेट मुकुंद जांबावलीकर यांनी आपल्या भाषणात मुक्ती संग्रामात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी संस्थेचे माजी अध्यक्ष श्री संजय हेगडे, तसेच ॲडव्होकेट जर्मन फर्नांडिस व ॲडव्होकेट केशव नाईक यांना आपल्या भाषणातून श्रध्दांजली अर्पित केली. त्यामध्ये २०२१ मध्ये गमावलेल्या तीनही हिऱ्यांच्या अशा आठवणी जागवल्या की सभागृह शांतचित्ताने ते ऐकत होते. त्या तिघांचीही बालपणापासूनची जडणघडण, कष्ट करायची जिद्द, शून्यातून भरारी घेण्याची वृत्ती याचे वर्णन, सर्वांनाच प्रेरीत करून गेले..

त्यानंतर प्रख्यात लेखक ''दामोदर मावजो'' यांना, कोकणी भाषेतील साहित्यासाठीचा, २०२१ सालातला, ५७ वा ''ज्ञानपीठ'' पुरस्कार मिळाला, ही बाब आपल्या सर्व कोकणी भाषिक गोमंतिकांसाठी अत्यंत गर्वाची आहे हे ही त्यांनी आवर्जून सांगितले. ज्ञानपीठ हा साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो आणि २००८ साली गोव्याचे साहित्यिक, रविंद्र केळेकरांनंतर तो २०२१ साली दामोदर मावजो यांना मिळाला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. गेल्या चार दशकातील त्यांच्या विपुल साहित्यलेखनावरही त्यांनी प्रकाश टाकला. असे उत्साहवर्धक सकारात्मक भाषण, वेळेच्या कमतरतेमुळे आवरते घ्यावे लागले, याची चुटपूट सगळ्यांनाच लागून राहिली. त्यानंतर सौ. भारती दणाईत यांनी, सर्वांचे आवडते, संस्थेचे माजी अध्यक्ष श्री संजय हेगडे यांच्या स्म–तींना उजाळा दिला. सर्व श्रोते संजयबाबच्या आठवणींनी भावुक झाले तेव्हांच दोन मिनिटे शांतता पाळून सर्वांनी आदरांजली वाहिली.

त्यानंतरचा संगीताचा कार्यक्रम हा, खास संजयजींच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजिलेला होता. पं. रघुनाथ फडके यांनी सुमधुरपणे गायिलेल्या भक्तीसंगीताने वातावरण भारून गेले. पं. मिलिंद रायकर यांनी व्हायोलिनवर राग मालकंस अप्रतिम वाजवलाच परंतु संजयजींचे आवडते नाट्यसंगीत व मुकेशचे गाणेही वाजविले. त्यांच्या रायकर अकादमीच्या शिष्यांनी एकत्रितपणे व्हायोलिनवादनाचा अत्यंत आनंददायी अनुभव सर्वांना देऊन, राष्ट्रगीताने रात्री ९ वाजता कार्यक्रमाची सांगता झाली. अल्पोपहाराचाही कार्यक्रम त्यानंतर पार पडला.

# सुरेल आवाज हरपला



पं. रघुनाथ फडके

**शनिवारी रात्रौ १० वा. व्हाट्स अपवर मेसेज आला, गायक नट पं. रामदास कामत यांचे मुंबईत निधन. बातमी वाचून वाईट वाटले काही महिन्यापूर्वी त्यांच्याकडे बोलण्याचा प्रयत्न केला होता. पण प्रतिसाद मिळाला नाही. नाट्य आणि भावसंगीताच्या प्राचीवर प्रदीर्घ काळ तळपणाऱ्या गोमंतकीय कलावंतास आम्ही कायमचे मुकलो. अत्यंत गोड, सुरेल आवाज हरपला.**

मी ४० ते ४५ वर्ष मागे पोहचलो. मी गोवा कला अकादमीमध्ये संगीताचे शिक्षम घेत होतो. त्यावेळी संगीत नाटकं या ठिकाणी सादर होत असत. आम्हा विद्यार्थ्यांना त्यावेळी ती पर्वणीच असायची. एकही संगीत नाटक पाहणं चुकवायच नाही हा आमचा नियम. अशातच एका मत्स्यगंधा हे नाटक पाहिलं आणि मी स्तब्ध झालो. अत्यंत रुबाबदार अशा कामतबाबना मी नाटकात प्रथमच पहात होतो. नाटक झाल्यावर त्यांना भेटून आशीर्वाद घेणे हे माझे काम असायचे. निदान २० ते २२ वेळा तरी मी मत्स्यगंधा व कट्यारचे प्रयोग पाहिले आहेत.

यथावकाश मी गोवा कला अकादमीची शिष्यवृत्ती मिळवून पं. अभिषेकी बुंवांकडे पुढचे संगीताचे शिक्षण घेण्यासाठी मुंबईत आलो. बुवांच्या घरीत रीतसर शिक्षण सुरू झाले. आकाशवाणी मुंबईला नोकरी लागली आणि मी धन्य धन्य झालो. कारण या माझ्या तिन्ही देवतांच दर्शन मला अधून मधून होणार होतं.

> **रामदास कामत यांच्या बरोबर गायचा बरेच वेळा योग आला. त्यांचे मार्गदर्शन हे सोबत असणाऱ्या सहकलाकाराला एक प्रकारे धीर देण्याचे काम करायचे. 'घाबरायचे नाही' असे सांगायचे तरी घाम फुटायचाच, पण ते सांभाळून घेत असत.**

बुजुर्ग कलाकारांमध्ये एक गायक, अभिनेते म्हणून पं. रामदास कामत यांचे नाव घेता येईल. वेळेत येणे, चांगले गाणे पेश करणे हा त्यांचा ध्यास होता. आम्ही दोघेही गोव्याचे असल्याने कोंकणीत गप्पा सुरू व्हायच्या. आनंद वाटायचा. अशीच हळूहळू आपुलकी वाढत गेली. त्यांचे आकाशवाणीत ध्वनिमुद्रण असो किंवा ऑडिशन परीक्षक म्हणून आलेले असोत, माझी भेट घेतल्याशिवाय ते कधीही गेले नाहीत. तर एका कलाकाराची दुसऱ्या कलाकाराप्रती असलेली आदराची भावना सांगू इच्छितो. त्यांच्याबरोबर गप्पा मारताना, कायम 'अभिषेकी बुवा' हाच विषय असायचा. त्यांच्यामुळे 'मी घडलो' असे भावपूर्ण शब्द त्यांचे असायचे. नाटकांचे दौरे व एअर इंडिया मधील नोकरीत आपण व्यस्त असल्याकारणाने नाट्यसंगीताचे शिक्षण जरूर मिळाले पण शास्त्रीय संगीत बुवांकडे शिकू शकलो नाही याची खंत त्यांच्या मनात होती. अर्थात यशवंतबुवा जोशींकडे त्यांच शास्त्रीय संगीत शिक्षण झाले. मला मात्र नेहमी म्हणयाचे 'तू नशीबवान आहेस, तुला चांगले गुरु लाभलेत. चांगला अभ्यास कर, रियाज कर आणि यशस्वी शिखर गाठत रहा. कुठल्याही पदवीपेक्षा, सन्मानापेक्षा हे असे आशीर्वाद खूप स्फूर्ती देतात, अधिक चांगल काम करण्याचे बळ देतात, असे मला वाटते.

गोव्यात गणेशोत्सवात ४ ते ५ वेळा मला त्यांच्याबरोबर गाण्याचा कार्यक्रम सादर करण्याचा योग आला. मी गेली २० वर्षे ठाण्यात पं. अभिषेकी बुवा स्मृतिप्रीत्यर्थ प्रतिष्ठित गायक वादकांना घेऊन कार्यक्रम करतो. त्यासाठी पं. रामदास




**SUDESH BHOSALE**, well know as an Indian playback singer who primarily sings for Bollywood films. Bhosale is known for his ability to mimic actor Amitabh Bachchan, having sung for him in various films. He used mimicry to become a professional dubbing artist for several artists.
Bhosle was honored at the prestigious **DADA SAHEB PHALKE INTERNATIONAL FILM FESTIVAL AWARD 2022**, with a ‘Token of appreciation’ award on 20th February, 2022.

*Heartiest Congratulations!!*

*(Conti. from Page #3)*

**...सुरेल आवाज हरपला**

कामतांनी दोनदा येऊन आपली कला पेश केली आणि एकदा आम्ही त्यांचा ज्येष्ठ कलाकार म्हणून सत्कार केला. अत्यंत भारावून टाकणारे हे क्षण आहेत. पं. रामदास कामत हे संगीतरंगभूमी, भावगीत, अभंग, चित्रपटसंगीत या वैभवशाली परंपरेचे साक्षीदार. मी मुंबई आकाशवाणीवर (संगीत विभाग) काम करत असल्यामुळे सुमारे ६०% संगीताचे कार्यक्रम प्रसारित होत असतात. सकाळी वंदेमातरम झाल्यावर वारानुसार स्तोत्र प्रसारण व नंतर मंगलप्रभात हा भक्तिसंगीत कार्यक्रम ही प्रसारण वेळ निश्चित आहे. रामदास कामत यांचे अभंग ही हमखास रसिकांसाठी सुरेल पर्वणीच असते. गोव्याचे असल्याने मराठी प्रमाणे कोंकणी भाषेवर प्रभुत्व. त्यामुळे त्यांची रसाळ कोंकणी गाणीही अधूनमधून प्रसारित होत असतात.

रामदास कामत यांच्या बरोबर गायचा बरेच वेळा योग आला. त्यांचे मार्गदर्शन हे सोबत असणाऱ्या सहकलाकाराला एक प्रकारे धीर देण्याचे काम करायचे. ‘घाबरायचे नाही’ असे सांगायचे तरी घाम फुटायचाच, पण ते सांभाळून घेत असत, हा माझा अनुभव आहे. त्यांच्या जन्मगावी साखळीत श्री राधाकृष्ण संस्थानचा शतक महोत्स्व होता आणि मोठ्या कार्यक्रमाची जबाबदारी समितीने माझ्यावर दिली होती. भजनसम्राट अनुप जलोटा यांचा एक व दुसरा कार्यक्रम रामदास कामत, बकुळ पंडित, अर्चना कान्हेरे आणि मी अशा कलाकरांची नाट्यसंगीत रजनी. या कार्यक्रमासाठी निवेदक असावा ही एकच त्यांची अट होती. मला आठवते कामत साहेबांनी ‘देवाघरचे ज्ञात कुणाला’ या गाण्याचे अशी काय रंगत आणली !!!! अर्चना कान्हेरे बकुलताई पण छान गाऊन गेल्या. मी ‘‘गुंतता हृदय हे’’ आणि ‘‘जनविजन झाले आम्हा’’ ही त्यांचीच गाणी गायिलो होतो... विशेष म्हणजे गेली ३३ वर्षे गोव्यात फार्मगुडी फोंडा येथे फोंडा पत्रकार संघ आयोजित करीत असलेल्या गानसम्राज्ञी गिरीजाताई केळेकर संगीत समारोहात हमखास रंगणाऱ्या नाट्यसंगीत रजनी कार्यक्रमात त्यांचा अनेकवेळा सहभाग होता.

एकदा गोवा हिंदू असोसिएशनच्या वर्धा – पनदिनानिमित्त पार्ले गोमंतक हॉलमध्ये माझा कार्यक्रम होता. संस्थेचे एक सदस्य म्हणून ते आवर्जून या कार्यक्रमाला हजर होते. कार्यक्रमात मी शेवटी ‘‘केवल्याच्या चांदण्याला’’ ही भैरवी गायलो. त्यांना नमस्कार करायला गेलो, तेव्हा माझा हात हातात धरला आणि म्हणाले ‘‘रघुनाथ आज बुवांची आठवण झाली’’ हा कार्यक्त्रमाचा अभिप्राय नव्हता, तर तो रंगभूमीवरील एका सुरेल, अनुभवी, तपस्वी, पं. रामदास कामत यांचा आशीर्वाद होता... आयुष्यभर पुरतील अशा खूप आठवणी दाटून येत आहेत... इथेच थांबतो.

**एक प्रभावशाली मार्गदर्शक परलोकीच्या प्रवासाला निघाले... त्यांना भावपूण७ आदरांजली.**

दै. गोमन्तक यांच्या सौजन्यानें



# गोवा @६०

– राजू नायक
(संपादकीय संचालक; दै. गोमंतक)

गोव्यातील विधानसभा निवडणुकीतले मतदान झालेय. मतमोजणीला अवकाश आहे. थोडा विरंगुळा मिळावा म्हणून मी सुदूर इशान्येकडील अरुणाचल राज्यांत आलोय. या राज्यांत शंभरच्या आसपास आदिवासी जमाती आहेत. आपापल्या क्षेत्रात– परस्परांपासून योग्य ते अंतर ठेवून नांदताहेत. त्यांच्यात एकोपा वगैरे आहे, असे ढोबळ विधान करता येणार नाही, कारण प्रत्येकीचे अवकाश पृथक आहे. दोन दिवसांपूर्वी या राज्याने आपल्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला. स्वातंत्र्यानंतर या सगळ्या भूभागाला इशान्येकडील सरहद्दीचा भाग म्हणून संबोधले जायचे. इंदिरा गांधींनी या आदिवासींना त्यांचे वेगळे राज्य बहाल केले. त्याचे अरुणाचल हे नावही त्यानीच दिले. इंदिराजींना आदिवासींच्या पृथक संस्कृतीविषयी आस्था होती. मुख्य प्रवाहांत आणण्याच्या मिशाने त्याच्या सांस्कृतिक संचिताची भेसळ होऊ नये, त्यांची अस्मिता राखली जावी, याविषयी त्यांची ठाम मते होती. अंदमानमधील आदिवासींच्या बाबतीतही त्यानी हीच भूमिका घेतली होती. अरुणाचलचे वेगळेपण जपताना त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. त्या राज्यात जायला खास परवाना लागतो. कुणी भारतीय तेथे जमीन विकत घेऊ शकत नाही. तिथल्या जमातींनाही आपल्या वेगळ्या अस्मितेचे भान आहे.

मुक्तीचा हिरक महोत्सव साजरा करणाऱ्या गोव्याची अस्मितेच्या कसावर अरुणाचल प्रदेशकडे तुलना करण्याचा मोह मला आवरला नाही. साठींतल्या गोव्याने काय कमावले आणि काय गमावले असा विचार जेव्हा मी करतो तेव्हा मन बधीर होते खरे. ज्या उदात्त हेतूने गोव्याच्या मुक्तीसाठी शेकडो लोकांनी प्राणार्पण केले, ज्या ध्यासाने जनमत कौलात संघप्रदेशवाल्यानी प्राणांची बाजी लावली, त्याच्या जवळपासही आजचा गोवा पोहोचू शकत नाही, हे शल्य मुक्तीवर्षात जन्मलेल्या माझ्या पिढीला सतत वागवावे लागते आहे, याचे कारण म्हणजे की या पिढीच्या अपयशाचीही कहाणी आहे. विमुक्त गोव्याला राष्ट्रीय प्रवाहात सामिल होण्याची अश्लाघ्य घाई नडली, असे मला वाटते. १९८०च्या आसपास प्रादेशिक पक्ष असलेल्या महाराष्ट्रवादी गोमंतकल (म.गो.) पक्षाचे राजकारण सत्तेतून विरोधाकडे गेले, काँग्रेसकडे सत्ता आली आणि गोवा राष्ट्रीय प्रवाहात असा सामिल झाला की त्याच्या अस्तित्वाविषयीच आज प्रश्नचिन्ह उभे झालेले आहे. या राज्याच्या दुर्दैवाने कसोटीच्या काळात लाभलेल्या राजकीय नेतृत्वाला वैचारिक बैठक नव्हती. संस्कृती, अस्मिता या कोनाने विचार करण्याची कुवत नसल्याने डावे–उजवे न करता जे आले ते स्वीकारले असे काहीसे होत गेले. भांडवलदारी व्यवस्थेचा अनुनय तर पहिल्यापासूनच. गोव्याचे पहिले सरकार प्रत्यक्षांत भांडवलदारांचेच होते. त्याला तर गोवा पृथक राहावा असेही वाटत नव्हते. म.गो. पक्षाची स्थापनाच गोव्याच्या महाराष्ट्रातल्या विलिनीकरणाची वाट प्रशस्त करण्यासाठी झाली होती. आपला वेगळापणा जपत प्रगती साधता येते, हे इथल्या राज्यकर्त्यांना कधी उमगलेच नाही.

म्हणूनच आजदेखील गोव्याच्या संकल्पनेविषयी प्रचंड गोंधळ वैचारिक वर्तुळातदेखील दिसतो. गोवा म्हणजे काय? गोवा म्हणजे केवळ गोमंतकीय संस्कृतीच का? इथली भाषा, इथले सहजीवन, इथले संगीत, इथे खेळला जाणारा फूटबॉल, इथले किनारी पर्यटन, इथल्या लोकांची जीवनशैली... यापैकी कोण स्वतंत्रपणे गोवा ही संज्ञा समजावून सांगण्याची क्षमता राखून आहे? गोवेकरांनाही ह्याचे उत्तर देता येणार नाही.

गोव्याच्या हिंदू–ख्रिस्ती सहजीवनाची बरीच चर्चा होते. ती उथळच आहे. मुक्तीनंतर इथल्या हिंदू बहुसंख्याकांनी मगो पक्ष काढला तर ख्रिश्चनांनी उत्तरादाखल युनायटेड गोवन्स (यु.गो.) या पक्षाची स्थापना केली. दोन्ही पक्षांतले वैचारिक मतभेद तीव्रच होते. मारिया आवरोरा कुतो या विदुशी हल्लीच निवर्तल्या. धर्माने ख्रिस्ती असल्या तरी त्यांना आपल्या धर्मांतरपूर्व मुळांची जाण होती. त्या कपाळाला कुंकू लावायच्या, साडी नेसायच्या. अनेक लोक त्याना विचारत, तुम्ही ख्रिश्चन असून कपाळाला कुंकू का लावता? तुम्ही ख्रिस्तीच आहात ना..? वेशभूषेतूनही वेगळेपण

जपायला पाहिजे हा आग्रह या सवालांमागे असायचा आणि आजही तो तसाच आहे. तर मग हिंदू-ख्रिश्चनांचे साहचर्य म्हणजे नेमके काय? मारिया आवरोरा कुतो आपल्या एका पुस्तकांत याविषयी लिहिताना पद्मश्री (स्व.) सुरेश आमोणकर यांच्याशी झालेल्या संवादाचा संदर्भ देतात. आमोणकर त्यांना म्हणाले होते, गोव्यात हिंदू-ख्रिश्चन साहचर्य असे काही नाहीच. हे दोन्ही समाज एकामेकांत अंतर राखून नांदतात. त्यांची कालक्रमणा समांतर चालली आहे म्हणूनच दोन्ही समाजांत शांतता नांदते आहे. जर ते एकत्र आले तर नवनवी द्वंद्वाची प्रकरणे उद्भवतील, संघर्ष वाढेल. ख्रिस्ती विश्वाच्या वैचारिक उन्नयनाला आजही चर्चसंस्था प्रभावित करत असते आणि तिचा प्रभाव हा धार्मिकतेच्या अंगानेच जाणारा आहे. दुसरीकडे हिंदुत्ववादाचे स्तोम उर्वरित देशाप्रमाणे गोव्यातही माजू लागले आहे. म्हणजेच वाटा पृथक आहेत. तेथे समन्वय कसा असेल?

गेले दोन महिने निवडणुकांनी गोव्याचे वातावरण ढवळून काढले. या छोट्याश्या राज्याच्या अस्तित्वाला नख लागेल, असे मुद्दे आहेत, पण ते निवडणुकीच्या ऐरणीवर आलेच नाहीत. गोवा संपवायचा याविषयी सर्वच राजकीय पक्षांत आणि नेत्यांत एकमत झालेले दिसते. बुद्धीभेदाचेही प्रयोग रंगले. यात गोंधळ झाला तो सामान्य गोमंतकियांचा. जर सहजीवनाविषयी आस्था असेल तर गोवा कसा सांभाळायचा, यावरही एकमत व्हायला हवे. पण तसे घडताना दिसत नाही. जे दिसते ते विसंवादाचे द्योतक म्हणावे लागेल. चर्चसंस्थेचा उल्लेख वर आला आहे. मला आठवते, दिवंगत ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत चंद्रकांत केणी यांचे नाव मडगाव येथील एका चौकाला देण्यात यावे असा प्रस्ताव त्यांना मानणाऱ्या माझ्यासारख्या काही नागरिकांनी मध्यंतरी पुढे आणला. हा गट एरवी ख्रिस्ती समाजातील वैचारिक मंथनाशी सहानुभूती बाळगणारा असा होता. पण या प्रस्तावाला खुद्द चर्चसंस्थेच्या निर्देशनाखाली कडाडून विरोध झाला. त्या नामकरणातून ख्रिस्ती अस्मितेला धक्का पोहोचतो असा प्रचार केला गेला. आज त्या परिसरात गेल्यास समोरून येणारी हर दुसरी व्यक्ती बिगर गोमंतकीय सापडेल. तिथली दुकाने कधीच परप्रांतियांच्या ताब्यांत गेली आहेत. ख्रिस्ती सोडाच, गोमंतकियांचा टक्काही तिथे घसरत गेलाय. पण त्याचे वैषम्य ना कधी चर्चसंस्थेला वाटले ना नामकरणाला विरोध करणाऱ्या कथित बुद्धिवाद्यांना. प्राथमिकता बदलल्या की साहचर्यात आडकाठी निर्माण होते. त्याला अटकाव करण्याची क्षमता असलेले वैचारिक नेतृत्व गोवा या साठ वर्षांत तयार करू शकला नाही. गोंयकार या संज्ञेच्या पोटांत अनेक पोटभेद दडलेले आहेत आणि त्यांच्यातल्या तेढीची धार दिवसागणिक तिक्ष्ण होत चालली आहे. गोमंतकीय म्हणून आम्ही कुठपर्यंत एकजिनसी समाजाचे चित्र जगासमोर ठेवू, याविषयी मला तरी शंकाच वाटते. गोवा विरघळून जाण्याची शक्यता मात्र दिवसेंदिवस गडद होत चालली आहे.

दै. गोमन्तक यांच्या सौजन्यानें


Announcement

Aami Goenkar

**AAMI GOENKAR**
shall celebrate

# A MUSICAL PROGRAM

in the memory of late
**Pandit Ramdasbab Kamat**

on
**Satuday, April 30, 2022**

at
**GOMANTAK SEVA SANGH HALL**
Mahant Road Extn. end of Malviya Road
Vile Parle (E), Mumbai 400057


**Detailed program shall follow shortly.**





# एक षड्ज विसावला

डॉ. अजय वैद्य



**गोव्यात जन्मलेल्या रामदास कामत यांना संगीताचे बाळकडू घरीच मिळाले. माध्यमिक शिक्षण पणजीत पूर्ण करून ते पुढील शिक्षणासाठी मुंबईला गेले. वडील बंधू उपेंद्र कामत हे त्यांचे पहिले सांगितिक गुरू.**

छोटा गंधर्व, सुरेश हळदणकर यांच्या गायकीने प्रभावित झालेल्या रामदास कामतांच्या गळ्यावर नंतर संस्कार झाले ते पं. गोविंदराव अग्नी यांचे. 'धी गोवा हिंदू असोसिएशन' या संस्थेच्या राज्य नाट्यस्पर्धेतल्या संगीत संशयकल्लोळ या नाटकातून त्यांना गोपिनाथ सावरकरांच्या द्विदशर्नाखाली रंगमंचीय कारकिर्दीला सुरूवात केली आणि लागोपाठ तीन वर्षे उत्कृष्ट गायक नटाचे पारितोषिक मिळवून सं. मत्स्यगंधा या नाटकामधून व्यावसायिक रंगभूमीवर पहिले पाऊल टाकले. व्यावसायिक पदार्पणात त्यांना पं. जितेंद्र अभिषेकी गुरु म्हणून लाभले.

वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने त्यांनी अनेक नाटकांमधील गाणी अजरामर केली. सं. मत्स्यगंधा, ययाती देवयानी, मीरा मधुरा, धन्य ते गायनी कळा, हे बंध रेशमाचे या नवीन नाटकांबरोबरच संशयकल्लोळ, मानापमान, सौभद्र, शारदा, होनाजी बाळा या पारंपारिक संगीत नाटकांतही त्यांनी नायकाच्या भूमिका केल्या. अथक परिश्रम, गुरूंविषयी नितांत आदर व निरहंकारी स्वभाव यांमुळे ते लोकप्रिय गायक बनले. अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे ते दाने वर्षे अध्यक्ष होते. संगीत नाटक अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा जीवन गौरव अशा पुरस्कारांनी ते सन्मानित झाले होते.

सं. मत्स्यगंधा नाटकाची तालीम गोवा हिंदूच्या इमारतीत सुरू होती. एका खोलीत मा. दत्ताराम गद्य भागाची तालीम घेत होते, तर शेजारच्या खोलीत संगीताची तालीम अभिषेकी घेत होते. या नाटकात दीवराची भूमिका करणारे व मा. दीनानाथांबरोबर काम केलेले ज्येष्ठ नट परशुराम सामंत यांनी गाणे ऐकून रामकृष्ण नायकांना बोलावून घेतले आणि म्हणाले, या मुलाच्या गळ्यात मला दीनानाथांचा 'सा' भासतो आहे. या पोराला सोडू नका. हा मुलगा रंगभूमीवर नाव काढणार आहे. तो मुलगा म्हणजेच रामदास कामत. त्यावेळेचा तो 'सा' त्यांनी अखरेपर्यंत मेहनतपूर्वक जपला.

एका कार्यक्रमात मी त्यांना 'पंडित रामदास कामत' असे संबोधले. त्यांनी विनाविलंब प्रेक्षकांसमोरच मला खडसावले. ते म्हणाले, 'दोतोर, म्हाका पंडित म्हणू नाका हां. हांव पंडित न्ही. म्हर्जे कार्य इतले व्हड ना. हांवे ताणे (म्हणजे जितेंद्रने) शिकैल्लीं गाणीं प्रामाणिकपणानं गायली इतलेंच. सगलें श्रेय ताचें. पंडित तो. हांव न्ही.' स्वत:ला पंडित म्हणवून घेण्यासाठी धडपडणाऱ्या कलाकारांच्या दुनियेत कामतांचा हा प्रांजळपणा ठळकपणे उठून दिसतो, तो त्यांच्या गुरूंवरील श्रध्देमुळेच.

रामदास कामत हे 'शो मस्ट गो ऑन' या परंपरेचे पाईक. मुंबईच्या रवींद्र भवनात 'सं. मत्स्यगंधा' चे दुपारी साडेतीन व साडेआठ असे लागोपाठ प्रयोग होते. पहिला प्रयोग चालू असताना कामतांचे वडील अत्यवस्थ असल्याची बातमी कळली. रंगभूषेसह रामदासबाब घरी जाऊन वडिलांना बघून


आले. दुसऱ्या प्रयोगाच्या सुरूवातीलाच वडिलांच्या निधनाची बातमी कळली. पण प्रयोग संपवनूच मध्यरात्री रामदासबाब घरी गेले. त्यांच्या आईच्या निधनाची बातमीसुध्दा अशीच मत्स्यगंधाच्या प्रयोगावेळीच आली होती. पण प्रयोग अर्ध्यावर बंद नक करता तो पूर्ण करूनच ते घरी गेले. 'धी गोवा हिंदू'च्या नव्वदीला नाट्यसंगीताचा कार्यक्रम होता. त्यांच्या बायकोची प्रकृती खालावली होती. तरीही ते आले, पराशराच्या वेषात देवाघरचे पद गायले, मग संपूर्ण कार्यक्रम केला व रात्री न जेवता बायकोच्या काळजीने घरी परतले. त्याच पहाटे त्यांच्या बायकोचे निधन झाले होते. वैयक्तिक सुखदु:खे बाजूला सारून शो सुरू ठेवणाऱ्या पिढीतले कलाकार हळूहळू निखळत चालले आहेत.

ऐचएमव्ही कंपनीने त्यांच्या ६५ हून अधिक गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. मत्स्यगंधा नाटकातले देवाघरचे ज्ञात कुणाला हे त्यांचे ध्वनिमुद्रित झालेले पहिले गाणे. या गाण्याबरोबरच गुंतता हृदय हे, साद देती हिम शिखरे, नको विसरू संकेत मीलनाचा, प्रेम वरदान स्मर सदा, तम निशेचा सरला, सर्वात्मका सर्वेश्वरा या त्यांच्या नाट्यगीतांबरोबरच त्यांनी गायिलेली आकाशी फुलला चांदण्यांचा मळा, देवा तुझा मी सोनार, निगुर्णाचे भेटी आलो सगुणासंगे, पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव, वाटे भल्या पहाटे यावे, हे आदिमा हे अंतिमा, विनायका हो सिध्द गणेशा, हे शिवशंकर गिरिजा तनया, अशी भावगीते, भक्तिगीते व चित्रपट गीतेही लोकप्रिय आहेत. मुंबईचा जावई चित्रपटात त्यांनी गायिलेल्या प्रथम तुज पाहता जीव वेडावला, हे गाणे आजही प्रेमिकांचा जीव वेडा करते. अंरातल्या निळ्या घनांची शवय तुला आहे, जन विजन झाले, ही त्यांची गाणी आजही स्मरणात आहेत. स्वरराज छोटा गंधर्वांची छाप असलेले सं. सौभद्र नाटकातले बहुत दिन नच भेटलो सुंदरीला आणि पं. सुरेश हळदणकरांनी त्या काळात लोकप्रिय केलेले सं. होनाजी बाळा या नाटकातील श्रीरंगा कमलाकांता ही दोन्ही गाणी आज आपल्याला संगीत रंगभूमीच्या वैभव काळीच आठवण करून देतात.

भारतीय अभिजात म्हणजेच शास्त्रीय संगीत हे श्रेष्ठ आहेच; पण त्याबरोबरच इतर संगीत प्रकारांना कमी लेखून चालणार नाही. चित्रपट संगीत, भाव संगीत, नाट्यसंगीत, लोकसंगीत यांचेही संगीतात फार मोठे योगदान आहे. प्रत्येकाचा स्वत:चा असा वेगळा बाज आणि शैली आहे. त्यामुळे अमूकच संगीत प्रकार शिका किंवा अमूकच संगीत श्रेष्ठ आहे असे म्हणणे चुकीचे आहे, असे त्यांचे प्रांजळ पण आग्रही मत होते. आपली गाणी आजही रसिकांच्या मनात व ओठांवर आहेत हा आपल्यासाठी मोठा ठेवा असून कुठल्याही पुरस्कारापेक्षा हा पुरस्कार श्रेष्ठ असल्याचे ते सांगत असत.

असे हे आक्रमक गायकीचे नाट्यगीत गायक, गोमंतकाचे सुपुत्र रामदास कामत यांचे मुंबईत त्यांच्या राहत्या घरी शनिवार दि. ८ जानेवारी रोजी रात्री वृध्दापकाळाने निधन झाले आणि मराठी रंगभूमीवरचा एक आक्रमक षड्ज कायमचा विसावला. १८ फेब्रुवारीला त्यांनी ९२ व्या वर्षात पदार्पण केले असते. पं. जितेंद्र अभिषेकीसारख्या स्वरपारख्याने कलपकतेने रामदासबाबांसारख्या हिऱ्याला योग्य कोंदण तयार केले. या जोडीला मराठी संगीत रंगभूमीच्या इतिहासात आपल्या कर्तृत्वाने सुवर्णपान लिहून ठेवले आहे. रामदासबाबांच्या अतिशय नम्र व मनमिळाऊ स्वाभावामुळे त्यांचा सांगितिक प्रवास उलगडणाऱ्या जवळपास ४० मुलाखती घेण्याचे भाग्य मला लाभले. असा कलाकार आता पुन्हा होणे नाही. त्यांना विनम्र श्रध्दांजली.

दै. गोमन्तक यांच्या सौजन्यानें



# Obituary



Legendary singer **Lata Mangeshkar**, also known as the **'Melody Queen of India'** passed away at the age of 92

Born in Indore on Sept. 28, 1929, Mangeshkar first sang at religious gatherings with her father, who was also a trained singer. After she moved to Mumbai, India's film industry capital, she became a star with immense popular appeal, enchanting audiences with her smooth but sharp voice and immortalizing Hindi music for decades to come.

Regarded as one of Indian cinema's greatest playback singers, Mangeshkar started her career at the age of 13 in 1942 and has sung over 30,000 songs in various Indian languages.

In her over a seven-decade career, she has sung a host of memorable tracks.

The singer -- known as Melody Queen of India -- has been given the Bharat Ratna, India's highest civilian honour, as well as the Padma Bhushan, the Padma Vibhushan and the Dada Saheb Phalke Award.

Throughout her career, Mangeshkar worked with nearly all legendary Indian music directors, including the duo Madan Mohan, Naushad, SD Burman, RD Burman, Laxmikant-Pyarelal and A.R. Rahman, selling tens of millions of records. She also won dozens of singing awards, earning her a near saint-like status in the Bollywood music industry.

**"I am anguished beyond words," Prime Minister Narendra Modi said in a tweet.**

"She leaves a void in our nation that cannot be filled. The coming generations will remember her as a stalwart of Indian culture, whose melodious voice had an unparalleled ability to mesmerize people."

मराठी रंगभूमीवरील सुवर्णयुगाचे साक्षीदार आणि ज्येष्ठ गायक – अभिनेते **पंडित रामदास कामत** यांचे त्यांच्या निवासस्थानी वृध्दापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. संगीताचा गाढा अभ्यास केलेल्या पंडित रामदास कामत यांनी धि गोवा हिंदू असोसिएशनच्या 'संगीत संशय कल्लोळ' या नाटकाने आपल्या संगीत रंगभूमीवरील कारकिर्दीची सुरूवात केली होती. त्यानंतर त्यांनी 'संगीत शारदा', 'संगीत सौभद्र', 'संगीत मानापमान', 'संगीत मदनाची मंजिरी', 'संगीत एकच प्याला', 'संगीत मंदारमाला', 'संगीत होनाजी बाळा' अशा जवळपास अठरा संगीत नाटकांमधून काम केले होते.



पंडित रामदास बाब कामत

नोकरी सांभाळून तब्बल साठ वर्ष आपली सांगीतिक कारकिर्द मनापासून जपणाऱ्या पंडित रामदास कामत यांना २०१५ साली राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते मानाच्या संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००९ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते. त्यांच्या अभिनय व गायनासाठी अनेक पुरस्कारांनी गौरविले होते असे गोमंतकरत्न, महाराष्ट्रभूषण पंडित रामदास बाब कामत यांना भावपूर्ण श्रध्दांजली.




## MR. BRAHMANAND GAITONDE

Founder Patron Member of AAMI GOENKAR left for heavenly abode April 10, 2022 after brief illness.

May his divine soul rest in eternal peace and attain sadgati.



**SHRI K. M NAIK**, a friend, colleague and Senior Counsel passed away on Monday November 8th, 2021. He was the Chief Labour & Indl. Law Advisor for the Tata Group of Companies for last 40 Year's. He was also advisor for National/ Multinational Companies and was conducting their matters in Supreme Court & High Courts.

We have lost a good friend and a noble gentleman.

Our heartfelt condolences to the bereaved family members.

**MR. GERMAN FERNANDES,** Adv., High Court, a senior practitioner in Labour and Industrial Laws for over 4 decades.

Our heartfelt condolences to the bereaved family members.



# HOMEOPATHY:
## THE MISUNDERSTOOD SCIENCE

Dr Beena Wagle



Being a homeopath and choosing a title like this seems very weird doesn't it?

But sadly it's true. A system of medicine that is completely misunderstood for whatever reason it maybe. Its efficacy and scientific validity is repeatedly questioned. But we homeopaths are peace loving people who like our work to speak for itself. This is my humble attempt at introducing u to a science less understood and more misunderstood.

### WHY HOMEOPATHY?

- Safe for all age groups from infant to deathbed.
- No side effects.
- Easy to consume, kids love the sweet medicines, no need to carry water.
- Cheaper
- All the problems you have are tackled by same medicine, no need for multiple medicines and timings.
- Not only physical but mental and emotion related complaints tackled [stage fright, anxiety disorders, panic attacks, exam fear…
- So these are a few of the benefits of opting for homeopathic treatment.

### MYTHS ABOUT HOMEOPATHY:

- IT'S ONLY FOR CHRONIC ILLNESS…

  ~ No. we have results in minutes of having taken the medicine. Provided you have astutely stated your symptoms and the doctor has clearly understood what you are expressing.

- HOMEOPATHY IS JUST PLACEBO

  ~ How then do you explain growths disappearing, bones healing and pains ceasing on documented x-rays, MRIs and lab tests.

- HOMEOPATHY TREATS JUST COUGHS AND COLDS

  ~ No We have treated everything from allergies, diabetes, hypertension, anxiety disorders, tumors, visual problems, sensory problems and nerve disorders….homeopathy succeeds where other systems raise their hands. We not only provide hope but cure.

I am a practitioner of homeopathy for the last 20 years and I have been blessed by patients who have recovered and have recommended the system to others.

Attaching a couple of recent pictures and videos of my patients not for propaganda but for awareness and a humble attempt to understand HOMEOPATHY, the science with right perspective.







# Hindu Festive Season




Gudi Padwa is the Hindu festival, marking the victory of good over evil. Gudi Padwa, marks the beginning of Chaitra Sukla Paksha as per lunar calendar, the first month of the new year and is celebrated with religious rituals and other cultural events. It is believed that Lord Brahma created the universe on Gudi Padwa. According to the Brahma Purana, Gudi symbolizes the Brahmadhvaj -Brahma's flag. It also signifies the triumphal return of Lord Ram to Ayodhya from exile after killing the demon Ravan.

Gudi Padwa is also known as Sanvsar Padvo by the people of the Konkan region and Goa. Gudi Padva has a social significance as it is held to mark the beginning of the spring season. It is considered auspicious to start a new activity on this day, so is celebrated with great enthusiasm and joy. In Goa, people celebrate this festival and welcome the new year by garlanding the doorways of homes with mango leaves strung together and colourful rangoli patterns adorning floors, donning new clothes, extending greetings, exchange sweets and praying deities, feasting and participating in cultural activities. In Goa, Gudi is celebrated by consumption of neem leaves. Usually, in households, sweets including Puranpolis are made to be offered as prasad and among relatives and friends. The Shigmotsav festival, which is a prominent festival of Goa concludes on Gudi Padva day, with the arrival of the 'Vasant Ritu' or the spring season.

## Hanuman Jayanti



Hanuman Jayanti is celebrated on Chaitra Shukla Purnima, the full moon day. Hanuman is an inspiration to young generation to build robust physique and good character. There are many qualities of Hanuman which made him dear to Shri Ram. We should not celebrate these festivals on one day but do so throughout the year. Hanuman like personalities had no birth and death. One story of Hanuman is good enough for us to meditate on through our life, one quality of him we should pick up and emulate, make a part of our life, that will make our life joyous, blissful and auspicious.

In Goa, Marutigad in Mala area of Panaji has the most popular temple of Goa where the deity of Hanuman was consecrated and installed in 1933 and one has to climb a flight of 130 steps to reach it. In South Goa, Cacora has a temple of Maruti on Marutigad, where celebration is marked for three days - starting from April 6 to 8. Cultural activity such as 'Kirtan', 'Bhajan' and performances of dramas and singing of devotional songs are also organized.



## Ram Navami

Ram Navmi or the date of birth of Maryada Purushottama, Rama is observed on the ninth day of the month Chaitra. On Ram Navami, the temples are decorated and the images of Lord Rama are adorned with flowers. The day starts with chanting the Vedic mantras dedicated to Lord Vishnu. Rama's devotees observe fast on this day. In Goa, many temples offer food to devotees on this day. At noon, Rama's idol is put in the cradle and verses in Ramayana are read or recited in the temples. Naivedya on this occasion consists of powdered coconut mixed with sugar. In Goa, fairs are organized in various places. Lord Rama's birthday is celebrated with enthusiasm as it is believed to bring peace of mind and happiness to the people. The biggest celebration takes place at the Partgal Math in Canacona in south Goa where thousands of devotees gather to take part in the festivities

Published by: CA Mohan Sanzgiri for Aami Goenkar. Designed and Printed by: Paper&Pixels, Thane.
We do not take any responsibility for the contents & opinion expressed in the articles herein.